# इतिहास

**भारतात युरोपियन वसाहतीची सुरुवात (१६०० ते १८५७)**

- वास्को-द-गामाचे कालिकत बंदरातील पहिले पाऊल म्हणजेच युरोपियनांच्या व्यापाराला झालेली सुरुवात म्हणावी लागेल. सर्वप्रथम व्यापाराच्या निमित्ताने पोर्तृगीज आले.
- त्यानंतर त्यांच्या पाठोपाठ डच, इंग्रज, फ्रेच, इ. व्यापारी आले व ते हिंदुस्थानात व्यापार करु लागले. या व्यापारातून त्यांच्यात सालातज्ञ स्पर्धेला सुरुवात झाली. त्यातुनच इंग्रज फ्रेंच संघर्षातून कर्नाटकात तीन युध्दे लढली गेली.
- त्यात अंतिम विजय इंग्रजांना मिळाला व ते सत्तास्पर्धेत यशस्वी झाले. ब्रिटिशांच्या प्रशासकीय व्यवस्थेत आणि धोरणात विविध कायद्यांद्वारे बदल कसे होत गेले. याचा उहापोह या प्रकरणात केला आहे.
- प्लासीच्या युध्दाने इंग्रजांना साम्राज्य विस्ताराची गुरुकिल्ली मिळाली बक्सारच्या युध्दात विजय मिळाल्याने साम्राज्याविस्ताराचा खऱ्या अर्थाने पाया रोवला गेला.
- लॉड वेलस्लीने तैनाजी फौजेला पध्दशीर स्वरूप दिल्यामुळे भारतीय राज्यकर्त्यामध्ये त्याविषयी जे आकर्षण निर्माण झाले त्यातुन अनेक राजे, महाराजे व नबाब यांनी या पध्दतीचा स्वीकार केला.

युरोपियनांचे भारतात आगमन :

- पूर्वी भारतातील माल इराणचे आखात कॉन्स्टॅटिनोपल इटली या खुष्कीच्या मार्गाने युरोपियन देशात पाठवला जात असे. परंतु १४५३ मध्ये तुर्कानी कॉन्स्टॅटिनोपल हे शहर जिंकुन घेतल्यामुळे युरोपियनांचा भारताशी चालणारा व्यापारच बंद झाला कारण तुर्कानी युरोपियन व्यापाऱ्यांचा मार्गच अडवून धरला. आता युरोपियनांपुृढे एकच मार्ग होता.
- तो म्हणजे भारताकडे जाणाऱ्या समुद्रमार्गाचा शोध लावणे भारताशी सुरु असलेला व्यापार असा अचानक बंद पडल्यामुळे नेहमी लागणारा व भारतातून येणारा माल दुसऱ्या राष्ट्रांमध्ये मिळणे अशक्य होते.
- या गरजेतूनच युरोपियन व्यापारी व राज्यकर्ते भारताचा शोध समुद्रमार्गे लागतो का याचा प्रयत्न करु लागले या गरजेतूनच स्पॅनिश राजा राणीच्या मदतीने कोलंबस या धाडसी

खलाशाने अटलांटिक महासागर पार करुन भारताकडे जायाऱ्या मार्गाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

- त्याच्या या प्रयत्नामुळे तो १४९२ मध्ये अमेरिकेला जाऊन पोहचला म्हणजे त्यास अमेरिका हा नवीन खंड सापडला. पुढे लवकरच पोर्तुगाल या देशास भारताकडे जाणारा मार्ग शोधून काढण्यास यश मिळाले.
- वास्को-द-गामा हा पोर्तृगीज प्रवासी आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून २३ मे १४९८ रोजी कालिकत बंदरात येऊन पोहोचला. या दिवसापासून भारताच्या इतिहासाला नवीन वळण लागले वास्को-द-गामाचे कालिकत बंदरातील पहिले पाऊल म्हणजे युरोपियन संस्कृतीचे भारतीय किनाऱ्यावरील पहिले पाऊल होते.
- १६१५ मध्ये इंग्रज राजाचा प्रतिनिधी सर थॉमस रो याने जहांगीर बादशहाकडून प्रथमच व्यापारी सवलती मिळवल्या व त्यानंतर मच्छलीपट्टण, सुरत, मद्रास, कलकत्ता, मुंबई इ. अनेक ठिकाणी त्यांनी आपल्या वखारीउभारल्या नफा प्रचंड मिळत असल्यामुळे त्यांचा भारतातील व्यापार सारखा वाढत होता.
- काही मालाच्या बाबतीत या व्यापाऱ्यांना १०० टक्के फायदा मिळत होता. पुढे १७१७ साली विल्यम हॅमिल्टन नावाच्या एका इंग्रज डॉक्टरने मोगल बादशहा फारुक सियर याला एका भयंकर आजारापासून वाचवले या गोष्टीचा फायदा इंग्रज व्यापाऱ्यांनी घेतला व बंगालमध्ये जकात मुक्त व्यापार करण्याचे आणि भारतात व्यापाराच्या निमित्ताने वखार स्थापन करण्याचे फर्मान मिळविले.

## भूगोल

**भारतातील राज्य आणि नृत्य प्रकार**

१.महाराष्ट्र --- लावणी, कोळी नृत्य
२.तामिळनाडू --- भरतनाट्यम
३.केरळ --- कथकली
४.आंध्र प्रदेश --- कुचीपुडी, कोल्लतम
5.पंजाब --- भांगडा, गिद्धा
६.गुजरात --- गरबा, रास
७.ओरिसा --- ओडिसी
८.जम्मू आणी काश्मीर --- रौफ

९.आसाम --- बिहू, जुमर नाच
१०.उत्तरखंड --- गर्वाली
११.मध्य प्रदेश --- कर्मा, चार्कुला
१२.मेघालय --- लाहो
१३.कर्नाटका --- यक्षगान, हत्तारी
१४.मिझोरम --- खान्तुंम
१५.गोवा --- मंडो
१६.मणिपूर --- मणिपुरी
१७.अरुणाचल प्रदेश --- बार्दो छम
१८.झारखंड- कर्मा
१९.छत्तीसगढ --- पंथी
२०.राजस्थान --- घूमर
२१.पश्चिम बंगाल --- गंभीरा
२२.उत्तर प्रदेश --- कथक

## अर्थशास्त्र

**राष्ट्रीयकृत बैंक आणि त्यांची कार्यालय**

1. अलाहाबाद बैंक - कोलकाता
2. बैंक ऑफ इंडिया - मुंबई
3. बैंक ऑफ महाराष्ट्र - पुणे
4. केनरा बैंक - बैंगलोर
5. सेंट्रल बैंक ऑफ इंडिया - मुंबई
6. कॉरपोरेशन बैंक - मंगलौर
7. देना बैंक - मुंबई
8. इंडियन बैंक - चेन्नई
9. इंडियन ओवरसीज बैंक - चेन्नई
10. ओरिएंटल बैंक ऑफ कॉमर्स - नवी दिल्ली
11. पंजाब नेशनल बैंक - नवी दिल्ली
12. पंजाब एंड सिंध बैंक -- नवी दिल्ली
13. सिंडिकेट बैंक - मणिपाल
14. यूको बैंक - कोलकाता
15. यूनियन बैंक ऑफ इंडिया - मुंबई

16. यूनाइटेड बैंक ऑफ इंडिया - कोलकाता
17. विजया बैंक - बैंगलोर
18. आंध्रा बैंक - हैदराबाद
19. बैंक ऑफ बड़ौदा - मुंबई

## विज्ञान

**रक्ताच्या कर्करोगाचे प्रकार**

- सर्वात प्राणघातक कर्करोगांमध्ये रक्ताच्या कर्करोगाचा सहावा क्रमांक आहे. रक्ताच्या कर्करोगाचे तीन मुख्य प्रकार आहेत.
- सर्वात प्राणघातक कर्करोगांमध्ये रक्ताच्या कर्करोगाचा सहावा क्रमांक आहे. रक्ताच्या कर्करोगाचे तीन मुख्य प्रकार आहेत.
- सर्वात प्राणघातक कर्करोगांमध्ये रक्ताच्या कर्करोगाचा सहावा क्रमांक आहे. रक्ताच्या कर्करोगाचे तीन मुख्य प्रकार आहेत.

१.ल्युकेमिया

२.लिम्फोमा

३.मायेलोमा.

- ल्युकेमिया हा सर्वाधिक आढळणारा रक्ताचा कर्करोग आहे. त्यानंतर लिम्फोमा आणि मायेलोमाचे रुग्ण आढळतात.
- दरवर्षी देशभरात ल्युकेमियाचे ३५,००० नवे रुग्ण, लिम्फोमाचे ३२,००० नवे रुग्ण तर मायेलोमाचे ७,००० नवे रुग्ण आढळतात आणि रक्ताच्या कर्करोगामुळे दरवर्षी सुमारे ५०,००० व्यक्तींचा मृत्यू होतो. त्यामुळे लोकांना रक्ताच्या कर्करोगाविषयी जाणीव करून देणं महत्त्वाचं आहे.
- रक्ताच्या कर्करोगामुळे रक्तपेशींच्या कार्यात अडथळा निर्माण होतो. याची सुरुवात बोन मॅरोमध्ये होते, जिथे रक्ताची निर्मिती केली जाते. बोन मॅरोमधील स्टेम सेल्स परिपक्व होऊन लाल रक्तपेशी, पांढऱ्या रक्तपेशी आणि प्लेटलेट्समध्ये रुपांतरीत होतात.
- रक्ताच्या बहुतेक कर्करोगांमध्ये रक्तेपेशींच्या विकासाच्या प्रक्रियेत असाधारण प्रकारच्या रक्तपेशीच्या अनियंत्रित वाढीमुळे अडथळा निर्माण होतो.
- या कर्करोगाच्या पेशी सामान्य कार्य करणाऱ्या लाल रक्तपेशी, पांढऱ्या रक्तपेशी आणि प्लेटलेट्सच्या निर्मितीमध्ये अडथळा निर्माण करतो आणि त्यामुळे ऑक्सिजनचा पुरवठा करणं, जंतूसंसर्गाला प्रतिकार करणं किंवा गंभीर प्रकारचा रक्तस्त्राव थांबवणं यासारख्या कार्यांमध्ये अडथळा निर्माण होतो.

- कोणतंही कारण नसताना कमी झालेलं वजन, थकवा, अशक्तपणा जाणवणं किंवा धाप लागणं, चटकन जखम होणं किंवा रक्तस्त्राव होणं, लसिका गाठींचा आकार वाढणं, पोटात अस्वस्थ वाटणं, वारंवार किंवा पुन्हा-पुन्हा संसर्ग होणं, रात्री ताप येणं/ घाम येणं, हाडांमध्ये/सांध्यांमध्ये वेदना होणं, त्वचेला कंड सुटणं आणि हाडांमध्ये वेदना (बरगड्या, पाठ) इत्यादी रक्ताच्या कर्करोगाची लक्षणं आहेत. कर्करोगाच्या प्रकारानुसार ही लक्षणं बदलू शकतात.

## राज्यघटना

**Right To Education Act 2009**

RTE- 2009 चे कलमे - सदर अधिनियमात एकूण ३८ कलम आहेत. त्या कलमांचे शीर्षक, कलम क्रमांकानुसार खालीलप्रमाणे:

कलम क्रमांक १ = संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

कलम क्रमांक २ = व्याख्या.

कलम क्रमांक ३ = मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार.

कलम क्रमांक ४ = वयानुरूप प्रवेश (थेट).

कलम क्रमांक ५ = दाखला हस्तांतरण.

कलम क्रमांक ६ = शाळा स्थापन.

कलम क्रमांक ७ = आर्थीक व इतर जबाबदाऱ्या.

कलम क्रमांक ८ = शासनाची कर्तव्ये.

कलम क्रमांक ९ = स्थानिकप्राधिकरण कर्तव्ये.

कलम क्रमांक १० = माता पिता व पालक कर्तव्ये.

कलम क्रमांक ११ = शालापूर्व शिक्षण तरतूद.

कलम क्रमांक १२ = शाळांची जबाबदारी.

कलम क्रमांक १३ = प्रवेश फी व चाचणी पध्दत.

कलम क्रमांक १४ = प्रवेशासाठी वयाचा पुरावा.

कलम क्रमांक १५ = प्रवेशास नकार.

कलम क्रमांक १६ = मागे ठेवण्यास व निष्कासनास प्रतिबंध .

कलम क्रमांक १७ = शारिरीक शिक्षा व मानसीक त्रास प्रतिबंध.

कलम क्रमांक १८ = शाळा स्थापनेस मान्यता .

कलम क्रमांक १९ = शाळेसाठी मानके व निकष .

कलम क्रमांक २० = अनुसूचीमध्ये सुधारणा अधिकार .

कलम क्रमांक २१ = शाळा व्यव.स्थापन समिती .

कलम क्रमांक २२ = शालेय विकास योजना .

कलम क्रमांक २३ = शिक्षक नेमणूक,अहर्ता व अटी शर्ती.

कलम क्रमांक २४ = शिक्षकांची कर्तव्ये.

कलम क्रमांक २५ = विद्यार्थी शिक्षक प्रमाण.

कलम क्रमांक २६ = शिक्षकाची रिक्त पदे भरणे.

कलम क्रमांक २७ = शिक्षणेतर प्रयोजनास प्रतिबंध.

कलम क्रमांक २८ = खाजगी शिकवणी प्रतिबंध.

कलम क्रमांक २९ = अभ्यासक्रम व मुल्यमापन.

कलम क्रमांक ३० = परीक्षा व पूर्तता प्रमाणपत्र.

कलम क्रमांक ३१ = बालकाच्या हक्काचे सरंक्षण.

कलम क्रमांक ३२ = गाऱ्हाणी दूर करणे.

कलम क्रमांक ३३ = राष्ट्रीय सल्लागार परिषदेची स्थापना.

कलम क्रमांक ३४ = राज्य सल्लागार परिषदेची स्थापना.

कलम क्रमांक ३५ = निदेश देण्याचा अधिकार.

कलम क्रमांक ३६ = खटला चालविण्यास पूर्वमंजुरी.

कलम क्रमांक३७ = सदभावनापुर्वक कारवाईस संरक्षण.

कलम क्रमांक ३८ = समुचित शासनास नियम करण्याचा अधिकार.

## क्लुप्ती

**मुघल सत्तेचे सर्व बादशाह**

क्लूप्त्या : "BHAJI SABJI FOR MAA SHAB"

B = बाबर

H = हुमायू

A = सम्राट अकबर

J = जहांगीर

S = शहाजहान

A = औरंगजेब

B = बहादुरशहा पहिला

J = जाहांदरशहा

FOR = फारुख्शियार

M = मुहम्मद शाह

A = अहमदशाह

A = आलमगीर

SH = शाह  आलम

A = अकबर  दुसरा

B = बहादूर  शाह  जफर